विटावा ते कोपरी दरम्यान खाडी पुलाची उभारणी करणे व कळवा ते आत्माराम पाटील चौकी दरम्यानचे रस्ता रुंदीकरण व सर्व्हीस रोड हे प्रकल्प मार्गी लावणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: एमआरडी-३३१८/प्र.क्र.९/नवि-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १९ एप्रिल, २०१८

प्रस्तावना:-

ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विटावा ते कोपरी दरम्यान खाडी पुलाची उभारणी करणे व कळवा ते आत्माराम पाटील चौकी दरम्यानचे रस्ता रुंदीकरण व सर्व्हीस रोड हे प्रकल्प हाती घेण्याबाबत लोक प्रतिनिधी सतत मागणी करत होते. सदर मागणीच्या अनुषंगाने मा. विधानसभा सदस्यांनी महाराष्ट्र विधानमंडळाचे चौथे अधिवेशन (हिवाळी), २०१७ मध्ये विधासभा सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. सदर लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्यावेळी मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांनी सदर विषयासंदर्भात आठ दिवसामध्ये निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले होते. यासंदर्भात महाराष्ट्र विधानमंडळाचे पहिले अधिवेशन (अर्थसंकल्पीय), २०१८ मध्येही मा. विधानसभा सदस्यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. सदर लक्षवेधी सूचनेवर मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांनी यासंदर्भात लवकरच निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले होते.

ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विटावा ते कोपरी दरम्यान खाडी पुलाची उभारणी करणे व कळवा ते आत्माराम पाटील चौकी दरम्यानचे रस्ता रुंदीकरण व सर्व्हीस रोड हे प्रकल्प ठाणे महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या संस्थापैकी कोणत्या संस्थेने हाती घ्यावेत याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासनाच्या निर्णयार्थ प्रस्ताव सादर केला होता. लोकप्रतिनिधींची होत असलेली मागणी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासनास सादर केलेला अहवाल विचारात घेऊन शासन आता खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

<u>शासन निर्णय:-</u>

ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधील विटावा ते कोपरी दरम्यान खाडी पुलाची उभारणी करणे व कळवा ते आत्माराम पाटील चौकी दरम्यानचे रस्ता रुंदीकरण व सर्व्हीस रोड हे प्रकल्प ठाणे महानगरपालिकेने हाती घेण्यास या शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात येत आहेत.

सदर पुलाचे बांधकामाकरिता ठाणे महानगरपालिकेला तांत्रिक सहाय्याची आवश्यकता भासल्यास आवश्यकतेनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तांत्रिक सहाय्य करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०४१९११०६४३७०२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2018.04.19 12:13:39 +05'30'

(वि. श्री. पाटील)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.

३) मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. विरोधी पक्ष नेता, (विधान परिषद/विधान सभा), महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.

५) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) महानगर आयुक्त, मुंबई महागनर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पू.) मुंबई

८) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

९) निवड नस्ती, (नवि-७).